**वि.दि.मु.नं.५३५/२०२२**
**अभिजीत मोरे**
**वि.**
**सुमन सकपाळ**
**नि.क्र.४४ वर सुरू**

**वादीचा शपथेवर उर्वरित उलटतपास प्रतिवादी क्र. १, २, ४ व ५ चे वकील श्री.यु. जी. कदम यांचेकडून सुरू:**

**२९.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्यातील परिच्छेद क्र.१२ मध्ये दि.०९/१२/२०२१ रोजी समजुतीचा करारनामा झाल्याचे खरे लिहीले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यासोबत नि.क्र.३ लगत दस्त क्र.३ हा त्याच करारनाम्याची छायांकीत प्रत आहे. आता साक्षीदाराला प्रतिवादीतर्फे दाखल नि.क्र.६१ लगत दस्त क्र.१ दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, त्यानुसार लिहूण देणार मी असून, लिहूण घेणार प्रतिवादी क्र. १ आणि २ व मान्यता देणारे प्रतिवादी क्र. ४ आणि ५ असे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या करारनाम्यावर शेवटी माझी तसेच प्रतिवादी क्र. १, २, ४ व ५ यांच्या सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याच प्रमाणे त्या करारानाम्यावर आमच्या अंगठयाची निशाणी देखील आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या दस्ताच्या शेवटून दुस-या पानावर माझ्या फोटो शेजारी माझी सही तसेच अंगठयाचे निशाण आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १, २, ४ व ५ यांनी माझ्यासमक्ष सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही की, हा करारनामा मयुर शिवाजी संकपाळ आणि विकास शिवाजी संकपाळ या दोन साक्षीदारांच्या समक्ष करण्यात आला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा करारनामा नोटराइज ॲड. नवनाथ देशमुख यांच्याकडे करण्यात आला आहे.

प्रश्न:- हा करारनामा दि.१०/१२/२०२१ रोजी नोटराइज करण्यात आला होता का?

उत्तर: माझ्यासमक्ष नोटरी करण्यात आलेला नाही.

हे म्हणणे खरे आहे की, सदर दस्तऐवज हा दि.१०/१२/२०२१ रोजी नोटरी केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर करारनामा हा मी वाचून समजून सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.३ लगत अनु.क्र.३ ची छायांकीत प्रत ही मला दि.१०/१२/२०२१ रोजी प्राप्त झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरची छायांकीत प्रत ही मला ३ ते ४ दिवसांनी मिळालेली होती. हे म्हणणे खरे नाही की, मुळ दस्ताच्या नवीन जोडणी केलेल्या ७/१२ उतारा, आधार कार्डच्या प्रती नव्हत्या. नोटरी करताना या दस्त्याच्या पाठीमागे काहीही जोडले नव्हते केवळ दस्त होता. साक्षीदाराने सदरचा करारनामा मान्य केल्याने त्यास **नि.क्र.६२** देण्यात येते.

३०. हे म्हणणे खरे आहे की, या दस्तासाठी मी दि.२४/११/२०२१ रोजी ५०० रुपयांचा स्टॅम्पपेपर खरेदी करून आणून ठेवला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यानंतर त्यात वर्णन असलेला मजकुर टंकलिखीत करून घेतला. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.६२ च्या दस्तामध्ये केवळ दुकान गाळा क्र.०६ चा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.६२ मध्ये मोबदल्याच्या रकमेचा उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.६२ च्या करारनाम्याद्वारे दुकान क्र.०६ देण्याचे ठरले होते परंतु, निश्चित किती रकमेला देण्याचे हे ठरले नव्हते.

३१. हे म्हणणे खरे नाही की, दुकान गाळा घेताना इलेक्ट्रीक मिटर, पाण्याचे कनेक्शन, सोसायटी फॉरमेशन यासाठी खरेदीदाराला पैसे द्यावे लागतात. साक्षीदार सांगतो की, जुने बांधकाम पाडून नवीन बांधकाम केल्यास पैसे द्यावे लागत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.६२ च्या करारनाम्यात इलेक्ट्रीक मिटर, पाण्याचे कनेक्शन, सोसायटी फॉरमेशनसाठी लागणारी रक्कम मला द्यावी लागणार नाही याचा उल्लेख करारनाम्यात नाही. करारनाम्याच्या परिच्छेद क्र.४ मध्ये मला रक्कम द्यायची नाही असा उल्लेख केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, करारनामा नि.क्र.६२ मध्ये दुकान गाळा क्र.०६ मला विक्री करणार आहे याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, करारनाम्यामध्ये खरेदी हा शब्द नाही.

३२. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात दोन दुकान गाळया बद्दल केलेला उल्लेख चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आणि प्रतिवादी दरम्यान दुकान गाळा क्र.०४ च्या खरेदी-विक्री बाबत कधीही चर्चा झाली नाही अथवा करार झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील परिच्छेद क्र. १२ मधील 'त्यामुळे मी सदर समजुतीचे करारनाम्या---------तुम्हास देतो असे मला सांगितले' हा मजकुर चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ दुकान गाळा क्र. ०६ बाबतच करार झाला होता त्यामुळे मी नि.क्र.६२ वर सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही की, करार केल्यानंतर दुकान गाळा क्र.०४ खरेदी करण्याचा कधीही संबंध आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल करण्यापुर्वी प्रतिवादींना दुकान गाळा क्र.०४ संदर्भात नोटीस देण्यास मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दुकान गाळा क्र.०४ संदर्भात कोणताच व्यवहार न झाल्याने मी त्याची नोटीस दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल करण्यासाठी कोणतेही कारण घडले नाही.

३३. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी गाळा क्र. ०६ संदर्भाने उर्वरित रक्कमेची व इतर खर्चाच्या रकमेची मागणी माझ्याकडे केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या रकमांच्या कारणांवरून माझ्यात आणि प्रतिवादींमध्ये वाद-विवाद झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी सन २०१३ च्या

करारनाम्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १ व २ यांना १४ लाखची रक्कम अदा केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, ती उर्वरित रक्कम द्यावी लागू नये या उद्देशाने मी प्रतिवादींविरूध्द खोटा दावा दाखल केला आहे.

**३४.** हे म्हणणे खरे नाही की, मी इनकमटॅक्स रिर्टनमध्ये खरेदीची रक्कम नमुद केली नसल्याने नि.क्र.६२ च्या करारनाम्यात रक्कम नमुद न करण्याची मी प्रतिवादींना विनंती केली. हे म्हणणे खरे नाही की, केवळ माझ्या सांगण्यामुळ नि.क्र.६२ मध्ये खरेदीची रक्कम नमुद केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सी.ए. याच्या सल्यानुसार करारनाम्यात नंतर रक्कम नमुद करण्याचे मी प्रतिवादींना सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१३ च्या करारनाम्यात नमुद साडेतीन लाख याशिवाय कोणतीही रक्कम दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, २०१३ च्या करारनाका हा जुन्या बांधकामाच्या दोन खोल्यांच्या संदर्भाने होता. हे म्हणणे खरे आहे की, हे जुने बांधकाम आता पाडण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, ते बांधकाम अस्तीत्वात नसल्याने मला दोन खोल्या मागण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही. मला अजूनही त्या जुन्या खोल्या मिळाव्या अशी माझी मागणी नाही. मला माझी दिलेली रक्कम परत दिल्यास मी हा दावा काढून घेण्यास तयार नाही. हे मला माहिती नाही की, दुकान गाळा क्र.०४ हा प्रतिवादी क्र. ४ शिवाजी संकपाळ याच्या हिश्यास येतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ४ व माझ्या दरम्यान दुकान गाळा क्र. ०४ संदर्भात कोणताही करारनामा झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे दुकान गाळा क्र. ०४ हा खरेदी होवून मिळण्याचा मला कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दुकान गाळा क्र.०६ चा उर्वरित मोबदला व इतर खर्चाच्या रक्कम बुडविण्याच्या उद्देशाने हा दावा दाखल केला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.**

SAPANA ARUN HARNE
Digitally signed by SAPANA ARUN HARNE
Date: 2025.12.23 12:55:35 +0530

सातारा. ( एस. ए. हरणे)

दिनांकः-२३/१२/२०२५ ६ वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, सातारा.